# प्रकाशमार्ग

Volume 4 Issue 8 MAY 2012 Rs. 25

## चिंतन

महर्षी कृष्णानंद, अनुवाद : जयंत देशपांडे

प्रकाशाद्वारे क्रांती आता घडते आहे. आता आपण या क्रांतीला पुढच्या पातळीवर नेऊ या. तिची व्याप्ती वाढवूया. आपल्या जागृतीपासून या क्रांतीला सुरुवात होते. आपण वास्तवांबद्दल जागृत होतो. जीवनाच्या, मृत्यूच्या, सृष्टीच्या, नवयुगाच्या, २०१२ सालाच्या शेवटी घडणाऱ्या महान बदलांच्या..... अशा अनेक वास्तवांबद्दल आपण जागृत होतो. भ्रष्टाचार, शोषण, हिंसा इत्यादींना टिकवून ठेवणाऱ्या वास्तवांबद्दलसुद्धा आपण जागृत होतो. आपण असहाय नाही आहोत, या वास्तवाबद्दलही आपण जागृत होतो. प्रकाश आपल्या मदतीसाठी आहे, हे आपल्याला कळते.

पहिल्या जागृतीनंतर आपण भ्रष्टाचार, शोषण आणि हिंसेला मानसिक पातळीवर नाकारायला सुरुवात करतो. जेव्हा आपल्यापैकी बहुसंख्य लोक या गोष्टी नाकारतात, तेव्हा प्रबळ स्पंदनांच्या लाटा तयार होतात आणि त्या सूक्ष्म पातळीवर कार्य करतात. जेव्हा आपण प्रकाश प्रवाहित करतो (चॅनल करतो), तेव्हा भ्रष्ट व्यवस्था कोसळू लागतात आणि नव्या व्यवस्था आकार घेऊ लागतात. जेव्हा भ्रष्ट कृती उघडकीस येतात, जेव्हा लोक बलात्कारी शिक्षकांना आणखी सहन न करता त्यांना बदडून काढतात आणि जेव्हा लोक आतंकवादाला नाकारतात तेव्हा मला प्रकाशाद्वारे क्रांतीची सुरुवात झालेली दिसते.

प्रकाशाद्वारे क्रांती ही एक मूक क्रांती आहे. ही क्रांती अहिंसक आहे. अराजकीय आहे. धर्मनिरपेक्ष आहे. ही भौतिक स्वरूपाची नाही. ही एका देशापुरती मर्यादित नाही; जागतिक आहे. या महान क्रांतीत आपण एकटे नाही; कित्येक सूक्ष्म व्यक्तित्वे आपल्यासोबत आहेत. ते सूक्ष्म पातळीवरून आपले मार्गदर्शन करीत आहेत, आपल्याला साहाय्य करीत आहेत आणि आपले नेतृत्व करीत आहेत. आपल्यापैकी खूप लोक त्यांचे कार्य जाणू शकत नाही. पण असो. आपल्याला सर्वकाही माहीत असणे आवश्यक नाही. आणि आपण सर्वकाही कधीच जाणूही शकत नाही.

७ मेला, संध्याकाळी ७.४५ ते ८ वाजेपर्यंत (स्थानिक वेळ), खूप मोठ्या संख्येने प्रकाश प्रवाहित (चॅनल) करून प्रकाशाद्वारे क्रांतीला पुढील पातळीवर नेण्यासाठी, आम्ही आमच्या वेबसाइटवर दिलेल्या आमंत्रणाला खूप चांगला प्रतिसाद मिळतो आहे. लोकांना हे काहीतरी नवीन वाटते आहे. प्रकाश प्रवहनाचा कसा व काय फायदा होतो, हे त्यांना कदाचित पूर्णपणे समजत नसेल, तरीही ते म्हणतात : आम्ही आमच्या घरांतून प्रकाश प्रवाहित करून या क्रांतीत सामील होऊ. मी म्हणतो : धन्यवाद. कृपया या क्रांतीला इतरांपर्यंत पोहोचवा. प्रत्येक आत्मा ह्याला प्रतिसाद देईल कारण ही आत्म्याच्या पातळीवरील चळवळ आहे. प्रकाश आत्म्याला स्पर्श करतो, आपल्या अंत:करणाला स्पर्श करतो. आत्म्याला त्याचे आकलन होते आणि तो काळाच्या हाकेला, नवयुगाच्या, एका नव्या जगाच्या हाकेला ओ देतो.

मी या पृथ्वीवरील प्रत्येक आत्म्याला अपील करतो की, त्यांनी ७ मेला प्रकाश प्रवाहित करावा आणि तेवढ्यावरच थांबू नये. दररोज प्रकाश प्रवाहित करावा.

प्रकाश प्रथम आपल्या अंत:करणात शांती, प्रेम आणि परिपूर्णता आणतो आणि नंतर ती बाह्य जगात आणतो. नंतर बाहेरील जगापर्यंत पोहोचवतो. प्रकाश आपल्यामध्ये चमत्कारिक बदल घडवतो, आपल्याला सर्व तऱ्हेने मदत करतो आणि आपल्याला वैश्विक बनवतो.

या क्रांतीला आपण गंभीरतेने घेऊ या. आपण वेळ वाया न घालवता ही प्रकाशाद्वारे होणारी क्रांती उभारू या. ■

### प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९-१९८२)

**ऋषींनी शिकवले तसे आम्ही ध्यान शिकवतो.**

### प्रकाश
सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वत: परमेश्वरच.

### प्रकाशकार्य
सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव
या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी
सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर
प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद
महर्षी अमरांचे पट्टशिष्य आहेत. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्तर्षींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग
हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

### दृढ वचन
★ आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
★ प्रेम हा आपला स्वभाव आहे.
★ शांतता ही आपली भाषा आहे
★ ध्यान हा आपला मार्ग आहे
★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

**मानसा फाउंडेशन (रजि.)**
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर-बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : (०८०) २८४६५२८०, ९९०००७५२८० (सकाळी १० ते दु. ४ पर्यंत)
इ-मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com

## ध्यान वर्ग

### तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

### बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम

### आनेकल येथे


**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)
**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिला कॉलम वाचावा.


**Doorways (इंग्रजीत) /**
**तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)**
**वार्षिक वर्गणी रू. ३००/-**
**ड्राफ्ट कृपया मानसा लाइट**
**एज फाउंडेशन च्या नावाने काढावा.**
**कृपया 'मनी ऑर्डर' ने पैसे पाठवू नये.**

### वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.



गुरुजी
कृष्णानंद



## रोज प्रकाश प्रवाहित करा

दूर करा भ्रष्टाचार, हिंसा

**सामील व्हा**
**प्रकाश प्रवाहकांच्या संमेलनात**
**सोमवार, ७ मे २०१२ रोजी**
आपल्याच जागेवरून

**स्थानिक वेळ संध्याकाळी ७.४५ पासून १५ मिनिटांसाठी प्रकाश प्रवाहित करा**

**किंवा**
**चौडैय्या मेमोरियल हॉल, बंगलोर येथे संध्याकाळी ७ वाजता**

रजिस्टर करण्यासाठी कृपया ०९९०००७५२८० वर संपर्क करा

इंटरनेट वरून कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण – संध्याकाळी ७ वाजता (भारतीय वेळ)

**www.lightchannels.com/RevolutionByLight**

### काही ठळक घडामोडी

- २०-५-२०१२ रोजी तपोनगरात गुरुजींचा वाढदिवस साजरा करण्यात येईल. ह्या कार्यक्रमात भाग घेण्यासाठी कृपया १५-५-२०१२ पर्यंत आपले नाव नोंदवावे.
- Guruji Speaks (Vol-5), आणि "Master-Pupil Talks" ह्या पुस्तकाचा सौ. प्रेरणा काळे ह्यांनी केलेला मराठी अनुवाद, ही दोन पुस्तके २०-५-२०१२ रोजी तपोनगरात होणाऱ्या गुरुजींच्या वाढदिवस समारंभात प्रकाशित करण्यात येतील.
- २-४-२०१२ रोजी आनेकल येथील आपल्या सप्तर्षी ध्यान केंद्राचा चौथा वार्षिक दिन साजरा करण्यात आला.
- ४-४-२०१२ रोजी आयोजित केलेल्या ओरिएंटेशन वर्गात तपोनगर येथे व इंटरनेटवरून प्रत्यक्ष प्रसारणाद्वारे २५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

### गुरुजींचा वाढदिवस समारंभ रविवार, २० मे २०१२

सकाळी ११ वाजता – स्वागत
व्याख्यान
गुरुजींचे व्याख्यान
पुस्तकांचे प्रकाशन
विशेष ध्यान
गुरुजींकडून
आशीर्वाद
दुपारी १२.३० वाजता – प्रसाद

१९-५-२०१२ रोजी सकाळी ११.३० वाजता आनेकल येथील आपल्या सप्तर्षी ध्यान केंद्रात गुरुजींचा वाढदिवस साजरा करण्यात येईल.

### ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०१ | मंगळवार | शुक्ल दशमी |
| ०६ | रविवार | बुद्ध पौर्णिमा |
| १३ | रविवार | कृष्णाष्टमी |
| १८ | शुक्रवार | गुरुजींचा वाढदिवस प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ – चौथा वार्षिक दिन |
| १९ | शनिवार | शिवरात्री |
| २० | रविवार | गुरुजींचा वाढदिवस समारंभ / अमावास्या |
| २१ | सोमवार | सूर्य ग्रहण: सकाळी २.२६ ते ८.१९ पर्यंत |
| २४ | गुरुवार | कल्की भगवानांचा वाढदिवस |
| २९ | मंगळवार | शुक्लाष्टमी |
| ३१ | गुरुवार | शुक्ल दशमी |

### तपोनगरातील कार्यक्रम

दर रविवारी – व्याख्यान सकाळी ११ ते १२ पर्यंत
– विशेष ध्यान आणि प्रकाश प्रवहन, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत

रविवार १३ – शंबला गटाची बैठक दुपारी २ वाजता

गुरुजींसोबत अनौपचारिक बैठक शनिवार, १२-५-२०१२ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत आयोजित करण्यात येईल. ह्यात भाग घेण्याची इच्छा असणाऱ्यांनी मानसा कार्यालयात आपले नाव नोंदवावे.

७-५-२०१२, सोमवार रोजी चौडय्या कलाक्षेत्रात "लाइट चॅनल्स मीट" होणार असल्याने आनेकल आणि महालक्ष्मी केंद्रात ध्यान वर्ग होणार नाही.

## "लाईट चॅनल्स वर्ल्ड मूव्हमेंट" बद्दल वृत्तांत

- एका शाळेत जेव्हा प्रकाश प्रवहनाचे सत्र सुरू होते, तेव्हा तेथे हजर असलेला एक कावळा शांतपणे बसतो. मुले आणि शिक्षक शांती अनुभवतात. मुलांची ग्रहणक्षमता सुधारते. श्रद्धेने आणि प्रामाणिकपणे प्रकाशाचे प्रवहन करणाऱ्या मुलांचे आणि शिक्षकांचे हे खरेखुरे अनुभव आहेत.
- संपूर्ण निसर्ग आणि सजीव प्राणी नवयुगासाठी तयार आहेत आणि वाट पहात आहेत. वाट पहात आहेत मानवप्राण्यांच्या तयार होण्याची! ■

## प्रकाश प्रवहनाचे अनुभव

एका शाळेत जेव्हा मी प्रकाश प्रवहनाची सविस्तर माहिती देण्यास सुरुवात केली, तेव्हा एक कावळा खिडकीतून उडून आत आला आणि पंख्यावर बसला. तो खूप कर्कश आणि कानठळ्या बसवणाऱ्या आवाजात ओरडत होता. पण जेव्हा आम्ही प्रवहन सुरू केले तेव्हा तो स्तब्ध झाला. असे वाटत होते जणू तो देखील प्रवहन करीत होता. सत्राच्या संपूर्ण वेळात तो त्याच अचल आसनस्थितीत होता आणि सत्रानंतर जेव्हा मुलींनी बोलायला सुरुवात केली तेव्हा तो हळूच खिडकीतून बाहेर उडून गेला.

– राजलक्ष्मी, स्वयंसेवक

मी जेव्हा प्रकाश प्रवाहित करीत होतो, तेव्हा मला माझ्या वर्गातील डेस्क आणि बेंचेस प्रकाशाने तळपताना दिसले.

– एक विद्यार्थी, वर्ग ४, केंद्रीय विद्यालय, सदाशिवनगर, बंगलोर

मी जेव्हा प्रकाश प्रवहनासाठी बसतो तेव्हा मला माझ्या आजूबाजूचे आवाज ऐकू येतात, तरी पण मी शांत असतो.

– अतीश अरुण गायकवाड, वर्ग ७, बालविकास कॉर्पोरेशन स्कूल, पुणे

माझ्या वर्गातील मुले एकाग्रतेने अभ्यास करीत आहेत आणि त्यांची स्मरणशक्ती सुधारली आहे. त्यांची नैतिक, शारीरिक आणि मानसिक प्रवृत्ती सुधारली आहे. प्रकाश प्रवहनाने त्यांच्या सर्वांगीण विकासात मदत झाली आहे असे मी म्हणू शकते.

– श्रीमती. रंगनायकम्मा के. एस., सहाय्यक मुख्याध्यापिका,
वुमेन्स पीस लीग हायर प्रायमरी स्कूल, बंगलोर

## तपोनगर डगयरी

सीमा अलमेल, अनुवाद : वैशाली जोशी

अनेक वर्षांपूर्वी भगवान श्रीकृष्णांनी गुरुजींना चिक्कगुब्बी गावात तपोनगर उभारण्याची सूचना केली. जवळ एक छोटासा जमिनीचा तुकडा, खिसा जवळ जवळ रिकामाच, पण स्वप्नांनी भरलेले मन घेऊन आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे महर्षी अमरांची पवित्र रक्षा एवढ्या सामग्रीनिशी गुरुजींनी ऋषींचे हे निवासस्थान वसवले. गुरुजी – दैवी कार्याची जबाबदारी घेणारे महान गुरु! मानवी स्तरावरची त्यांची अत्यल्प साधने त्यांना मर्यादित करू शकली नाहीत. त्यांनी ध्यानवर्ग सुरू करून तपोनगर उभारण्यास सुरुवात केली. त्यांच्या ध्यानाच्या सामर्थ्याने आणि मनाच्या शुद्धतेने त्यांनी कुंडलिनी शक्ती, वैश्विक ऊर्जा आणि 'रा' ऊर्जासारख्या दुर्मिळ ऊर्जाशक्ती आणून त्यांची स्थापना केली. प्रत्येक ऊर्जेसाठी त्यांनी वेगवेगळे ध्यान मंदिर बांधले. तपोनगरास गुरुजींनी तपोवनाने सजवले आणि त्यांच्या विनंतीवरून सप्त ऋषींनी त्यांच्या व्यक्तिगत ऊर्जा उपलब्ध करून दिल्या. त्यांनी मानसीचे संरक्षक क्षेत्र बांधले.

गुरुजींचे विद्यार्थी तपोनगराचे रहिवासी झाले. प्रत्येक रहिवाशाच्या घराची वास्तुशांती गुरुजींच्या उपस्थितीत होते. तपोनगरवासियांची संख्या सतत वाढते आहे आणि गुरुजींनी त्यांना सहजीवनासाठी तयार केले आहे. प्रेम आणि इच्छास्वातंत्र्य हे त्यांनी नेमून दिलेले आधारभूत नियम आहेत. तपोनगरातील प्रत्येक वीट गुरुजींच्या ऊर्जांनी स्पंदित होते.

एक सर्वात मोठी योजना ज्यावर गुरुजी कार्य करीत आहेत ती आहे त्यांचे विद्यार्थी. त्यांचे तपोनगरवासींना घडवणे सतत चालू आहे – रहिवासी आणि अनिवासी देखील. व्यक्तींमध्ये आणि संपूर्ण जगात प्रकाश युग निर्माण करण्यासाठी त्यांच्या अथक प्रयत्नांना गती आली आहे. इतिहास साक्षी आहे की त्यांचे कार्य पूर्ण होईपर्यंत ते थांबणार नाहीत त्यांच्याशी जे समानार्थी आहे असे त्यांच्या स्वप्नातील तपोनगर प्रत्यक्षात जगणे हीच आपली त्यांना त्यांच्या वाढदिवसाची भेट असू शकते. ■

## प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंतःकरणाची चळवळ आहे. ह्या जगाला प्रेम व शांतीने परिपूर्ण अशी सुंदर जागा बनविण्यासाठी ही चळवळ आहे. एक अशी चळवळ जिच्यात प्रवचने नाहीत की घोषणा फलक नाहीत. एक अशी चळवळ जिच्यामध्ये प्रकाश उच्च जगातून प्रवाहित करून पृथ्वीतलावर आणणे व पसरवणे एवढेच पुरेसे आहे. प्रकाशाला प्रवाहित करा. मग शब्द जे करू शकत नाहीत ते सर्व तो प्रकाशच करेल.

आपण जेव्हा प्रकाश प्रवाहित करून पसरवतो तेव्हा तो इतरांच्या हृदयांत व घरात प्रवेश करतो आणि त्यांच्या भावना व विचारांत असलेल्या अंधःकाराला दूर करतो. त्यामुळे माणसांत परिवर्तन घडते. माणसांमधील परिवर्तनामुळे जगात परिवर्तन घडते आणि ते प्रकाशमय बनते.

हा चर्मचक्षूंना दिसणारा साधा प्रकाश नसून शक्तीच्या गाभ्यापासून येणारा अतिसूक्ष्म प्रकाश आहे. या मूलस्त्रोतातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्व काही आहे: शक्ती, विवेक आणि उज्वल भविष्य. आणि तो अदृश्यपणे सर्वत्र वास करून आहे.

आपण चॅनलिंग म्हणजे प्रवहन करून ह्या प्रकाशाला पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवूया. रोज सकाळी उठल्यावर आणि रात्री निजण्यापूर्वी ७ मिनिटे आपण हे करून ह्या जगाचे परिवर्तन करूया.

ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १८-०५-२००८ रोजी तारामंडळीय परिषदेने म्हणजेच सप्तर्षींनी गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत केली.

हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवा.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**ही प्राचीन ऋषींनी दिलेली सात तत्त्वे आहेत ज्यांचे पालन शंबला या पृथ्वीवरील प्रकाशाच्या नगरीत राहाणारे लोक करतात. हे लोक चिरतरुण असून शांती व परिपूर्णतेचे जीवन जगतात.**

१. तुमच्या अंतरंगातील प्रकाशाचा अनुभव घेऊन सभोवताली पसरवा.

२. प्रेमाचा अनुभव घ्या आणि प्रेम सर्वत्र पसरवा.

३. प्रत्येक जीवामध्ये आणि प्रत्येक वस्तूमध्ये जीवनाच्या एकात्मतेचा अनुभव घ्या.

४. दैनंदिन कामे करण्याआधी प्रथम त्यांची मनात उजळणी करा, नंतर हळू आवाजात त्यांचे शब्दांकन करा आणि नंतरच ती कृतीत उतरवा.

५. कोणतेही ध्येय पूर्ण होण्याआधी त्याविषयी कमीत कमी बोलून गुप्ततेचा नियम पाळा.

६. नकारात्मकतांशी लढा देण्यासाठी शरीर, मन आणि बुद्धीला चालना द्या.

७. उच्च आध्यात्मिक ध्येये गाठण्यासाठी स्वतःहून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवा.

# गुरुजी उवाच

(गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानातील वेचे)
(संकलन: शोभा राव; अनुवाद: पूर्णिमा परुळेकर)

०४-०३-२०१२

प्रकाशाच्या महासागराचा अनुभव घेण्याचा सराव आपल्याला सर्वोच्च अवस्थेप्रत नेण्यास पुरेसा आहे. परंतु, त्याकरिता आपण ह्या अभ्यासाला जास्त वेळ दिला पाहिजे आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे आपण त्याच्या प्रभावाला आपल्यावर काम करू देण्यास अवसर दिला पाहिजे.

प्रत्येक व्यक्तीला एक उच्च-आत्मा (हायर सेल्फ) असतो. या उच्च-आत्म्याचा एक भाग आता कामना करतो आहे की अंशतः खालच्या स्थूल पातळीवर येऊन, इथे सक्रिय होऊन त्या व्यक्तिला व या सुंदर वसुंधरेला मदत करावी. हा खूपच छान उलगडा आहे. जेव्हा आपण बदलू, तेव्हा हे जग बदलेल. कसे कोण जाणे पण आपण हे घडू देत नाही आहोत. कारण, आपल्या कर्मांच्या प्रचंड ओझ्यामुळे व नकारात्मकतेमुळे सुरवातीलाच आपला गाडा अडतो आहे. पहिले पाऊलच अडल्यामुळे आपण पुढे जाऊ शकत नाही आहोत. या परिस्थितीसाठी तुम्ही स्वतःला दोष देऊ नका की बोल लावू नका. आपण ५००० वर्षे कलियुगात काढली आहेत. त्यामुळे आपल्यामध्ये पुष्कळ नकारात्मकता आहेत. आपण प्रथम आपल्यातील नकारात्मकता ओळखली पाहिजे व ती निपटून टाकली पाहिजे. हे अवघड आहे. पण, आपण प्रयत्न करायला सुरवात करूया.

आपण, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली कार्य करणाऱ्या लोकांनी प्रकाश प्रवाहित करून प्रकाशाद्वारे क्रांती उभारायची आहे. ही क्रांती महत्त्वाची आहे कारण ती इतर सर्व क्रांतींचा आधारस्तंभ आहे. भ्रष्टाचारविरोधी चळवळ म्हणा की ईजिप्तमध्ये ज्याची सुरुवात झाली ते म्हणा, या अशा तऱ्हेने सुरू झालेल्या चळवळींचे फलित येणे अजून बाकी आहे. प्रकाश क्रांतीची आता सुरुवात होते आहे. प्रथम तुमचे घर, तुमची माणसे, तुमचा परिसर व त्यानंतर संपूर्ण जगाकडे अशा क्रमाने प्रकाश प्रवाहित करा. आपण पुढाऱ्यांकडे आणि जिथे प्रचंड खळबळ माजलेली आहे अशा ठिकाणांकडे प्रकाश प्रवाहित करू शकतो.

एका विद्यार्थीसाधकाने कळवले की जेव्हा कधीही तो ध्यानास बसतो त्याचवेळी घरमालक पाण्याचा पंप चालू करतो. तो कर्कश आवाज करतो. एके दिवशी ध्यानाला बसण्यापूर्वी त्याने नक्की देवाला प्रार्थना केली असणार कारण, अचानक कोणीतरी पंप बंद केला आणि तो त्रासदायक आवाज थांबला. त्याने देवाचे आभार मानले. विश्व आपल्याला अशा छोट्या छोट्या गोष्टींमध्ये कशी मदत करते ते लक्षात येण्यासाठी आपण सदा सावधान राहिले पाहिजे.

जेव्हा आपल्याला सभोवताली पीडित लोक दिसतात व आपण त्यांच्याकरिता काहीही करू शकत नसतो, अशावेळी काय करावे? महर्षी अमर म्हणत, त्यांच्याकडे प्रेम पाठवा, ते पुरेसे आहे. तुम्ही त्यांच्याकरिता याहून जास्त काही केले नाही यासाठी अपराधी वाटून घेऊ नका. कदाचित त्यामागे तुमची वैयक्तिक कारणे किंवा मर्यादा असतील. हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. दुसऱ्याविषयी करुणा वाटणे खूप सुंदर गोष्ट आहे.

प्रकाश प्रवहन करताना एक माणूस प्रकाशाला खोलीमागून खोलीत जात संपूर्ण घर भरून टाकताना पाहू शकतो. हे छान आहे. तो देवदूतांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न देखील करत आहे. अशा गोष्टी करण्याचा प्रयत्न कधीही करू नका. त्याचा देवदूतांशी संपर्क होण्याऐवजी कदाचित भटकणाऱ्या आत्म्यांशी संपर्क होण्याची शक्यता आहे. ते नवीनच संकटे उभी करतील. तसेच, त्यांचा पिच्छा सोडविणे माणसाला शक्य होत नाही. आपल्याला मार्गदर्शन करणाऱ्या ऋषींशी आपण संपर्क साधला पाहिजे.

११-०३-२०१२

एका माणसाने मला लिहून कळविले की प्रत्येक वेळी ध्यान करताना तो महर्षी अमरांशी संपर्क साधतो. माझी प्रत्येकाला वैयक्तिक सूचना आहे की असे करू नका. तुम्ही महर्षी अमरांना तुमचे प्रेम पाठवा पण त्यांची शांती भंग करू नका.

एका साधकाला झालेल्या दृष्टांतात त्याने ७ मेला होणाऱ्या प्रकाश प्रवाहकांच्या संमेलनाचे कामकाज व तदनुषंगाने अनेक तपशील पाहिले. त्यामध्ये माझ्यासाठी अनेक संदेश होते. पण, मला संदेश पाठविण्यासाठी ऋषींनी दृष्टांताचा वापर का बरे केला असावा? ते असे वागतात कारण, फार खोडकर आहेत ते!

एका माणसाने तपोवनातील एका चक्र मंडपाच्या काढलेल्या फोटोत प्रखर प्रकाश दिसतो आहे. हे तुम्हाला आठवण करून देण्यासाठी आहे की तुम्ही सुद्धा ह्या मंडपांचा उपयोग करू शकता व त्यांच्या खाली साठवलेल्या ऊर्जा ग्रहण करू शकता. आपल्याला विनासायास मिळणाऱ्या गोष्टींकडे आपण दुर्लक्ष करतो.

आपल्यातल्या प्रत्येकाने ईश्वरकृपेचे लहानमोठे अनुभव घेतलेले आहेत. बहुतांश वेळा आपल्या ते लक्षात येत नाहीत. आणि जेव्हा लोकांच्या लक्षात येते तेव्हा ते हर्षभरित होतात, त्यांना परमानंद होतो. एक स्त्री कॉस्मिक टॉवरमध्ये गेली होती. ती बाहेर आली तेव्हा तिला दाराजवळ मधमाशा उडताना दिसल्या. तिने दार लावून घेतले कारण फार पूर्वी तिला मधमाशांच्या हल्ल्याचा वाईट अनुभव आला होता. ती खाली बसली व तिने प्रार्थना केली. पाच मिनिटांनी ती बाहेर आली तेव्हा सर्व मधमाशा पोळ्यात जाऊन बसलेल्या होत्या. ईश्वराची कृपा पाहून ती रोमांचित झाली.

जेव्हा जेव्हा तुम्हाला काही चांगले व मौल्यवान मिळते, त्याचवेळी तुमची एकप्रकारे कसोटी सुद्धा घेतली जाते; हे एकत्रितपणे स्वीकारावे लागते. तुम्ही साधना करत असाल व सजग असाल तर तुम्ही चांगल्या बरोबर येणाऱ्या वाईटाचा प्रभाव टाळू शकाल. परंतु कधीकधी, आपल्याला ईश्वराकडून देखील देणग्या मिळत असतात, ज्या त्याच्या निखळ कृपेचे प्रतीक असतात. तुम्ही अशा गोष्टींचे निरीक्षण करण्यास सुरुवात केली पाहिजे. सर्व देणग्या ईश्वराकडूनच मिळत असतात.

कधीकधी आपल्याला जेव्हा आपल्या भूतकाळाची आणि भविष्यकाळाची जाणीव होते तेव्हा भूतकाळापासून आपल्याला प्रेरणा मिळते; भविष्याबद्दल आपण उत्कंठित होतो. आपण स्वाभाविकपणे राहिले पाहिजे, विकास केला पाहिजे आणि हा वर्तमानसुद्धा भूतकाळ व भविष्यकाळाइतका उदात्त, उत्कृष्ट केला पाहिजे. आपण यासाठी प्रामाणिक प्रयत्न करूया.

तुम्हाला टेलीपथी व प्राणऊर्जेवर जगण्याच्या कलेत तसेच सूक्ष्मदेहाने प्रवास करण्यात प्राविण्य संपादन करायची गरज नाही. तुम्हाला या देहाचे प्रकाश शरीर बनविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज नाही. प्रेमाची निवड करणे महत्त्वाचे आहे. तपासून पाहा की तुम्ही आत्म्याच्या पातळीवरून प्रेमाची निवड केली आहे का? तसे असेल तर उपरीनिर्दिष्ट सर्व गोष्टी तुमच्याकडे आपोआप चालत येतील. तुम्ही प्रयत्न करा, तुम्हाला काही अडचण आल्यास माझ्याकडे या.

देवदूतांबरोबर संपर्क साधणे सोपे असते. ते तुम्हाला ओळखत नसतात. तुम्ही ते तुमच्या जवळ आल्याशिवाय त्यांना ओळखू शकणार नाही. परंतु, प्रथम तुमच्या सभोवताली असलेल्या मनुष्यप्राण्यांबरोबर संपर्क साधणे अधिक महत्त्वाचे आहे.

आम्ही ७ मेच्या संमेलनासाठी इतर प्रकाश कार्यकर्त्यांशी संपर्क करण्याचे प्रयत्न करीत

## गुरुजी उवाच

(गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानातील वेचे)
(संकलन: शोभा राव; अनुवाद: पूर्णिमा परुळेकर)

आहोत. ही घटना स्थूल पातळीपेक्षा सूक्ष्म पातळीवर अधिक असेल. तरीही, त्या दिवशी जास्तीत जास्त लोकांनी प्रकाश प्रवाहित करावा यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. त्या तपशीलांची माहिती मी तुम्हाला देईन.

१८-०३-२०१२

जसजशी आध्यात्मिक वास्तवे आपल्याला अधिक चांगल्या तऱ्हेने उमगू लागतात, तसेच वर्तमानातील व भविष्यात घडणाऱ्या घटना लक्षात येऊ लागतात तेव्हा सदसद्विवेकबुद्धीशी प्रामाणिक असलेल्या माणसाला साहजिकच वाटते की अन्याय, भ्रष्टाचार आणि तत्सम गोष्टींनी भरलेल्या या जगात त्याच्यासाठी मुळीच जागा नाही. प्रकाश प्रवाहित करण्यापलीकडे आपल्या हातात दुसरे काही नाही. तुम्हाला याच जगात राहावे लागणार आहे हेच आव्हान आहे. म्हणजे तुम्ही हे सर्व सहन केले पाहिजे असे नाही. पण तुम्ही नेहमी झगडा करू शकत नाही. तुम्हाला तडजोड करावी लागते. त्याला पर्याय नाही. तुमचे प्रेम, सोशिकता अमर्याद वाढवा. इथे उपलब्ध झालेल्या विविध ऊर्जांमुळे तुमच्या अंतरंगात पुष्कळ गोष्टी घडू लागतील. कदाचित तुमच्या अंतरंगात एक प्रकारची विषण्णता, निराशा प्रवेश करेल जी तुम्हाला भौतिक जीवनाविषयी एक प्रकारच्या अनासक्तीकडे ढकलू शकेल. असे कधीही करू नका. अजून आशा जिवंत आहे, कारण लवकरच हे चित्र पालटणार आहे. म्हणून तोपर्यंत प्रकाशवहन करा, प्रकाशाचा प्रसार करा. तुम्हाला तुमचे भौतिक जीवन कौशल्याने सुसंघटित करावे लागेल ज्यायोगे तुमचे आध्यात्मिक जीवन बाधित होणार नाही.

झोप कमी होण्यासाठी आपल्याला अधिक काळ ध्यान करायला हवे व पहिल्या शंबला तत्त्वाचे अधिक काळ आचरण करायला हवे. त्यानंतर काही काळ प्रतीक्षा करायला हवी.

भविष्यात आपण कदाचित सर्ववेळ ध्यान करत नसू परंतु, आपण ईश्वराचा निराळ्या मार्गांनी अनुभव घेत असू. काळाच्या ह्या टप्प्यावर त्या पुढील आयुष्याविषयी अंदाज बांधणे खूप कठीण आहे. परंतु, आपण त्या काळात पोचणार आहोत. आपण त्याची प्रतीक्षा करायला हवी.

तुम्हाला सूक्ष्म स्तरावर कोणा ऋषींकडून जर खरोखरीची सूचना मिळाली तर ती थेट अंमलात आणू नका. कृपया प्रथम माझ्याशी संपर्क साधा. मी पाहिले आहे की कधीकधी वाईट व्यक्तित्वे आपण ऋषी असल्याचे भासवतात व सूचना देतात.

शंबला तत्त्वे अप्रतिम आहेत. परंतु प्रत्येक प्रसंगी, प्रत्येक ठिकाणी तुम्ही त्यांच्या विषयी बोलू शकत नाही. जेव्हा लोकांना ऐकण्यात स्वारस्य नसेल तेव्हा त्यांच्याविषयी बोलू नका.

विनम्रता अंतरंगातून उमलावी लागते. तुम्हाला मनापासून विनम्र व्हायचे नसते आणि तुम्ही मला तुम्हाला विनम्र बनवायला सांगता. कसे कोण जाणे पण आपण हे एक प्रकारचे नाटक आपल्यात खेळत असतो, स्वतःला फसवत असतो. स्वतःशी प्रामाणिक राहा आणि तुमच्यातील दोष, न्यूनता स्वीकारा.

कधीकधी जेव्हा तुम्हाला निराशा ग्रासते तेव्हा कुरकूर करण्यापेक्षा, तक्रार करण्यापेक्षा भौतिक स्तरावर आहे त्या परिस्थितीला सामोरे जा. तुम्हाला मार्ग बनवावा लागेल; ते शक्यही आहे. आशा कधीही सोडू नका. आम्ही तुमच्या बरोबर आहोत.

शंबला वर्गात उपस्थित राहणे तुम्हाला शक्य नसले व तुम्ही तसे आम्हाला कळवले नाही तर तुम्हाला शंबला गटातून काढून टाकण्यात येईल.

२५-०३-२०१२

जेव्हा आपलीच कर्मे निरोगीकरणाच्या मार्गात आडवी येतात तेव्हा आपण चिकाटीने प्रयत्न करीत राहावे. आपण आपल्या कर्मांकडे साहाय्याची विनंती सुद्धा करावी. त्यांना सांगावे, 'कृपया प्रकाश व्याधीग्रस्त भागाकडे नेऊन व्याधी व वेदना बरी करण्याच्या कामी मला मदत करा.' कर्मे सहकार्य करतात, आपली विनंती मानतात.

मला आठवते की अमर आम्हाला सांगत की आपण जेव्हा ध्यानाला सुरवात करतो तेव्हा देह, मन व बुद्धी सहकार्य करीत नाहीत. याचे साधे कारण असे आहे की त्यांना शिस्तीची सवय नसते. आणि ध्यान म्हणजे शिस्त. ते म्हणत की आपण ह्या त्रयीशी भांडता कामा नये. त्यांना विनंती करावी, चुचकारावे, त्यांना सांगावे 'कृपया मदत करा' आणि चिकाटीने प्रयत्न लावून धरावे. तुमच्या शरीर व्यवस्थेशी बोला. प्रेमाने तिच्याशी संवाद साधा. शरीराच्या प्रत्येक भागाकडून सहकार्य मिळेल.

एका स्त्रीने आयुष्यात प्रथमच प्रकाश प्रवहन केले, त्यावेळी तिला प्रकाश दिसला. हे ऐकून थक्क व्हायला होते. कोणत्याही साधनेला, कोणत्याही प्रयत्नाला, कोणत्याही नात्याला प्रेमाची जोड द्या. विलक्षण सुंदर परिणाम तुमच्या प्रत्ययास येतील. असे अनुभव आपल्या सर्वांना फार आनंद देऊन जातात.

एका स्त्रीने पत्रात लिहिले की तिने एका आजारी माणसाला प्रकाश पाठवायला सुरवात केली. तिच्या घरातील मोठ्या माणसांचा या गोष्टींवर विश्वास नाही, पण तेही मूकपणे ह्या कार्यात सहभागी झाले. जिथे प्रेम असते तिथे सर्वकाही होते. नुकतीच ध्यानाला सुरवात केलेल्या व्यक्तिला इतके विस्मयकारी अनुभव येऊ शकतात. हे अवधानाच्या किंवा प्रयत्नांच्या तीव्रतेवर अवलंबून असते.

आमच्याकडे ७ मेला प्रकाश प्रवाहकांचे संमेलन होणार आहे. त्याविषयी आम्ही तुम्हाला खूप माहिती देऊ. सध्या आम्ही त्यावर काम करीत आहोत. त्या दिवशी भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री पावणे आठ ते आठच्या दरम्यान, जिथे असतील तेथून प्रकाश प्रवहन करण्यासाठी जगातील अब्जावधी लोकांना यात सहभागी करून घेण्याचा आमचा मानस आहे. आम्ही अशा तऱ्हेचा पहिला कार्यक्रम कोरामंगला इन्डोर स्टेडियममध्ये केला होता. हा त्याचाच उत्तरार्ध आहे. प्रकाशाद्वारे होणाऱ्या क्रांतीला आम्हाला पुढच्या पायरीवर न्यायचे आहे. माझी इच्छा आहे की तुमच्यापैकी प्रत्येकाने या कार्यात नुसते सहभागी न होता हा संदेश पसरवण्यासाठी पराकोटीचे प्रयत्न करावे. ही समग्र क्रांती असेल व अंतिम क्रांती असेल. ह्या क्रांतीनंतर आपल्या पदरात लहान सहान फळ नाही तर चक्क नवयुग पडणार आहे.

आपण ऋषींच्या मार्गदर्शनाखाली जमलो आहोत ते कार्य करण्यासाठी, प्रकाशाद्वारे ही क्रांती उभारण्यासाठी, पृथ्वीवर नवयुग आणण्यासाठी; या संपूर्ण पृथ्वीला, तिच्या पाठीवरील संपूर्ण जीवनाला व प्रत्येक मनुष्यमात्राला नवयुगात नेण्यासाठी! ते आपले कार्य आहे. म्हणूनच आपण ते अत्यंत उत्कटतेने हाती घ्यायला हवे.

१ जानेवारी, २०१२ रोजी आणि पुन्हा २३ तारखेला, गुढी पाडव्याच्या दिवशी ऊर्जा प्रसारित करण्यात आल्या. प्रत्येकाला स्वतःसाठी व संपूर्ण जगासाठी शांती हवी आहे. शांती व प्रेमासाठीची ही तळमळ आत्म्यामधून येते. या ऊर्जा कार्य करतात व जागृत करतात. त्या आपल्याला आत्म्याच्या स्तरापासून जागृत करतात. या सर्व ऊर्जा परस्परांना साह्य करतात. आत्म्याच्या स्तरावर आणखी जागृती होईल कारण, जागृती ही अखंड चालणारी प्रक्रिया असते. जाणिवेत आणखी वृद्धी होईल तशीच ती प्रेमातही होईल. परिवर्तनासाठी, परिवर्तन वेगाने होण्यासाठी जास्त आणि मोठे अवसर प्राप्त होतील. आपण ते हेरून त्यांचा उपयोग केला पाहिजे आणि पुढे गेले पाहिजे. ■

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्ष ध्यानवर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क २००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क १००० रू. आहे.

वार्षिक शुल्कात पाठ्यपुस्तकांची किंमत आणि आमच्या कुठल्याही एका भाषेतील मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ–मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- सगळ्या शंका आणि प्रश्नांची उत्तरं गुरुजी स्वतः देतात.
- मराठीत लिहिलेल्या पत्रांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

चेक/ड्राफ्ट "Manasa Light Age Foundation Bangalore" च्या नावाने काढावा.

## गुरुजींकडून विशेष सूचना

- विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## गुरुजी

जयंत देशपांडे, अनुवाद : सुनिता देशपांडे

गुरुजींच्या जीवनाबद्दल चिंतन करत असताना, त्यांना ज्या संघर्षातून जावे लागले, जे अपमान सहन करावे लागले त्याबद्दल विचार करत असताना मला वाटले की, ते या सर्वातून का गेले असावेत? जेव्हा त्यांना चांगले माहीत होते की, या जगात जन्म घेतल्यावर त्यांना अशा वेदना सहन कराव्या लागतील, तर त्यांनी इथे जन्मच का घेतला ? गुरुजींसारखे महात्मे आपल्यासाठी, इथे अडकून पडलेल्या आत्म्यांसाठी जन्म घेतात. देवाबद्दल, त्याच्या सृष्टीबद्दल आणि इथे अडकून पडलेल्या आत्म्यांबद्दल असणाऱ्या त्यांच्या प्रेमाची खोली जाणणे फार कठीण आहे. इथे अडकून पडलेल्या आत्म्यांच्या मदतीसाठी कोणीतरी यायलाच हवे आणि कदाचित त्यांचे प्रेम लोकांना पूर्णपणे समजणार नाही, त्यांच्या प्रेमाला प्रतिसाद मिळणार नाही याची पूर्ण कल्पना असून सुद्धा गुरुजींसारखे महात्मे स्वेच्छेने यासाठी इथे खाली येतात.

एका महान लेखकाने एकदा असे म्हटले होते, की तो त्याच्या काळजाच्या रक्ताने लिखाण करतो आणि जेव्हा त्याच्या लिखाणाबद्दल लोक असंवेदनशील असतात तेव्हा तो दुखावला जातो. मानसाची निर्मिती गुरुजींनी त्यांच्या आत्म्याच्या ऊर्जांनी केली आहे. मानसाचा हर एक पैलू घडवताना त्यांनी त्यांच्या आत्म्यातील निरपेक्ष प्रेम त्यात ओतले आहे. मानसा म्हणजे फक्त येथील काही वास्तू नव्हेत. येथील लोक, येथील ऊर्जा आणि येथील ज्ञान म्हणजे मानसा आहे. मानसाच्या कणाकणातून गुरुजींचा आत्मा चमकतो. इथल्या ज्ञानाला एक प्रकारे त्यांची वैयक्तिक छटा आहे. इथे असणाऱ्या ऊर्जांचे आधिपत्य करणारी व्यक्तिमत्त्वे इथे आहेत कारण गुरुजींवर त्यांचे नितांत प्रेम आहे. येथील लोक सुद्धा त्यांच्यावर असलेल्या प्रेमामुळे इथे आहेत. त्यांच्यासोबत असणाऱ्या लोकांच्या अस्तित्वाला गुरुजींमुळेच एक उद्देश मिळाला आहे. आपणा सर्वांची नियती त्यांच्यामुळे प्रभावित झाली आहे आणि जर आपण पूर्णपणे शरण गेलो तर आपली नियती तेच घडवतील. अशी नियती किती सुंदर असेल.

त्यांच्या ऊर्जांना साद देऊन लोकांना प्रगती करताना पाहणे हे त्यांच्यासाठी किती समाधानकारक असेल आणि त्याचवेळी त्यांच्या ऊर्जांना प्रतिसाद न देणाऱ्या लोकांना संघर्ष करताना पाहणे हे त्यांच्यासाठी किती दुःखदायी असेल. परंतु ते सदैव आशावादी असतात आणि संधींवर संधी देत राहतात. त्यांना नेहमीच अपरिपूर्ण आत्म्यांवर मेहनत घ्यावी लागते. त्या दृष्टीने पाहता त्यांचे कार्य हे नेहमीच आव्हानात्मक असते. ■

## गुरुजी – मार्गदर्शक प्रकाश

श्यामलादेवी, अनुवाद : सुनिता देशपांडे

गुरुजींनी एका खास कार्यासाठी – या पृथ्वीवर सर्वोच्च आध्यात्मिक अधिकाऱ्यांच्या केंद्राची स्थापना करण्यासाठी आणि मानवतेला नवयुगाकडे घेऊन जाण्यासाठी – या पृथ्वीवर जन्म घेतला आहे. सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी (सप्त ऋषी) त्यांच्या माध्यमातून कार्य करतात. त्यांच्याकडे अजूनही पुष्कळ जबाबदारीची कामे आहेत; ती म्हणजे उच्च पातळीवरून ज्ञान, त्याचा विपर्यास होऊ न देता खाली या पृथ्वीवर आणणे, या काळासाठी आवश्यक त्या ऊर्जा पृथ्वीवर आणणे, कालौघात विरूपित, विपर्यस्त झालेल्या ज्ञानाला यथार्थ विवेचन देणे आणि कठीण प्रलय काळातून, २०१२ सालातून सुखरूप पार पडण्यासाठी लोकांना शिक्षित करणे इत्यादी.

५१००० वर्षांतून एकदा प्रत्येक कालचक्रात, नवयुगात प्रवेश करण्यासाठी लोकांना मार्गदर्शन करण्याचे कार्य नेहमी त्यांचे गुरू, महर्षी अमरांपासून सुरू होते आणि गुरुजी त्या कार्याला पुढे चालवतात. हे कार्य खूप प्रचंड आहे, कोणाच्याही कल्पनाशक्तीच्या बाहेरचे आहे आणि त्यासाठी कित्येक जन्मांच्या तयारीची आणि प्रशिक्षणाची गरज असते. अशा भक्कम पार्श्वभूमीसह गुरुजींना, ऋषींच्या या केंद्र निर्मितीकरिता त्यांच्या जीवनात बऱ्याच कसोट्यांमधून, यातनांतून जावे लागले. "ऋषींप्रती आणि त्यांच्या कामाप्रती माझी प्रतिबद्धता जोखण्यासाठी ऋषींनी हे सर्व घडू दिले." त्याशिवाय गुरुजींनी स्वेच्छेनेच स्वतःसाठी कठीण मार्गाची निवड केली.

गुरुजींची निवड सूक्ष्म पातळीवर कार्य करण्यासाठी झाली होती. इतर पातळ्यांवर काम करून आणि या पातळीवर लोकांना ध्यानाचे प्रशिक्षण देऊन आणि त्यांचे मार्गदर्शन करून, हे जीवन परिपूर्णरीत्या जगून ते ऋषित्वाच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचले. त्यांच्या सरळ आणि दुसऱ्यांना गृहीत न धरण्याच्या स्वभावामुळे आपण त्यांना आपल्यापैकीच एक म्हणून गृहीत धरायला लागतो. महात्मे हे असे असतात. ते कधीही स्वतःबद्दल दवंडी पिटत नाही की स्वतःचा मोठेपणा जाहीर करत नाही. शांतपणे प्रकाश पसरवत ते सर्वांमध्ये मिसळतात.

ज्या प्रकाशात मानवतेमध्ये जागृती घडवण्याची, नवीन जाणीव तयार करण्याची शक्ती आहे, अशा प्रकाशाने या संपूर्ण पृथ्वीला भरून टाकण्याच्या आवश्यकतेबद्दल कोणीही बोलण्याच्या पुष्कळ आधीच, प्रकाशगुरु गुरुजींनी, २००८ साली पृथ्वीवरील त्यांच्या कार्याचा एक भाग म्हणून प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ (लाइट चॅनल्स वर्ल्ड मूव्हमेंट) सुरू केली. एक सच्चा गुरुच फक्त हे जाणू शकतो की कोणाला काय आणि केव्हा द्यायचे. २४ तास अथक कार्य करणारे गुरुजी हे या जगाची आशा आहेत. ते म्हणजे मानवतेचा मार्गदर्शक प्रकाश आहेत. ■

## गुरुजी

अपूर्वा देशपांडे, अनुवाद : प्रेरणा काळे

माझ्या लॅपटॉपवरील कर्सर सारखा लुकलुकत जणूकाही मला सांगतो आहे की चला आता लिहायला सुरुवात करा. पण मला शब्द सुचत नाहीत. मला एका अशा माणसाचे वर्णन करायचे आहे ज्यांचे आपल्या सर्वांच्या आयुष्यांतील अस्तित्व हाच मुळात एक चमत्कार आहे. त्यामुळे येणाऱ्या जबाबदारीखाली मी जवळपास दडपून गेले आहे. मी टी. व्ही. वर वेगवेगळे चॅनल्स पाहते आहे आणि एका चॅनलवर एक बाबा प्रवचन करताना दिसतात. तिकडे एक प्रचंड मोठे उंच व्यासपीठ आणि संरक्षक कठडे आहेत. पोलीस जीव तोडून बाबांची सुरक्षा सांभाळत आहेत. बाबांपासून चांगल्या १०० फूट अंतरापासून अनुयायांच्या बैठकीची व्यवस्था आहे. ते पाहून माझ्या मनात पहिला विचार हा येतो की, हे बाबा लोकांना आध्यात्मिक आणि प्रापंचिक अशा दोन्ही बाजूंनी किती अप्राप्य आहेत.

मानसा मधलं दृश्य किती वेगळं असतं. इकडे आपल्याला आपल्या प्रिय गुरुजींचे नुसते ओझरते दर्शन घेण्यासाठी माना उंच करत तळपत्या उन्हात ताटकळत बसावे लागत नाही. इकडे गुरुंजीचे असे शाही नखरे नसतात. मला लहानपणची गुरुजींची आठवण अजून आहे. माझ्या बालिश प्रश्नांकडे सुद्धा ते मोठ्यांनी विचारलेल्या प्रश्नांइतकेच लक्ष पुरवीत. त्यांनी कधीच माझ्या प्रश्नांना कमी लेखले नाही. यातूनच त्यांचा खरा मोठेपणा दिसतो.

गुरुजी नेहमी म्हणतात की माणसाच्या छोट्या छोट्या कृतींतून त्याची पारख होते. गुरुजी जीवनातल्या छोट्यातल्या छोट्या गोष्टी सुद्धा अत्यंत निर्दोष आणि परिपूर्णतेने करतात. त्यांच्या प्रत्येक कृतीत, त्यांनी उच्चारलेल्या प्रत्येक शब्दात खूप सफाईदारपणा व खूप प्रेम असते. गुरुजींनी आईच्या मायेने आमचे संगोपन केले आहे. कधी कधी ते आमच्या बाबतीत खूप कठोर होतात पण त्यामागे खूप सारे प्रेम असते आणि मनापासूनची काळजी असते. आम्ही खूपदा आमच्या वागण्याने गुरुजींची पूर्ण निराशा केली आहे पण तरी कधीही त्यांनी आमच्याबद्दल आशा सोडली नाही. गुरुजींसारखा थोर माणूस आपल्यासारख्या सामान्य माणसांबरोबर चालणे पसंत करतो, आपल्याला प्रत्येक पावलावर आधार देतो, आपण पडतो तेव्हा उचलून वर घेतो, कारण त्यांना आपली प्रगती झालेली व आपण नव नवीन उंची गाठलेली पाहायची आहे. ■

## आमचे आध्यात्मिक पिता

वैशाली जोशी, अनुवाद : प्रेरणा काळे

गुरुजी, आमचे आध्यात्मिक पिता यांचे आम्हा प्रत्येकाशी एक खास नाते आहे, एक खास बंधन आहे ज्यात सर्व पातळ्यांवर निर्मळ दैवी प्रेम प्रत्यक्षात अवतरले आहे. त्यांचे आमच्यावर निरपेक्ष, चुका पोटात घेणारं, कुठलेही मत न ठरवता केलेलं प्रेम आहे. जे कुठल्याही परिस्थितीत बदलत नाही. त्या बरोबरच ते आंधळं नाही आणि तडजोड करणारंही नाही. जेव्हा आम्ही चुका करतो तेव्हा आम्हाला योग्य प्रकारे शिकवून आमची आध्यात्मिक उन्नती होण्यासाठी ते मदत करतं. आमचे धडे आम्ही आमच्या गतीनुसार घेण्याची मुभा ते आम्हाला वेगवेगळ्या संधी देऊन करतात. अत्यंत शांतपणे वाट पाहात, मार्गदर्शन करत आमच्या जीवनातले अडथळे दूर करून साधनेत प्रगती करून जीवनात परिपूर्ण होऊन वाटचाल करण्यासाठी साहाय्य करतात.

आमच्यावर अनंत फायद्यांची बरसात करणारे ते एक ऋषी असले तरी आमच्याकडून त्यांची एक साधीशी अपेक्षा आहे; आम्ही ध्यान करावे, स्वत:ला बदलावे आणि प्रकाशाचे प्रवहन करावे. परिपूर्ण होण्यासाठी, आणि जीवनातला अत्युच्च अनुभव घेण्यासाठी म्हणजे देवाला अनुभवण्यासाठी ते सतत आम्हाला मार्गदर्शन करत असतात. ■

## गुरुजी, एक असामान्य व्यक्तिमत्त्व

सुनिता देशपांडे

मी लोकांना त्यांच्या स्वभावाच्या, वागण्याच्या व त्यांच्या वृत्तीच्या छटा बदलताना पाहिले आहे. मी ऋतु बदलताना, वस्तू निरुपयोगी होताना, परिस्थिती बदलताना पाहिली आहे. बदल हा तर प्रकृतीचा नियमच आहे. पण मी अशा एका असामान्य व्यक्तिमत्त्वाला पाहिले आहे, जे आजही तेवढेच आनंदी, प्रेमळ, सोशिक आणि संयमी आहेत, जेवढे ते, मी पहिल्यांदा त्यांना पाहिले, तेव्हा होते. ते म्हणजे आपले गुरुजी. आजही ते आपल्यावर तितक्याच प्रेमाने, तशाच उत्साहाने मेहनत घेतात जितकी ते आपण त्यांना पहिल्यांदा भेटलो तेव्हा घेत असत.

ते प्रत्येक साधकाला हळूवारपणे घडवत आहेत. एखाद्या दगडाला मूर्तीरूप देतांना शिल्पकाराला जीव ओतून, कितीतरी धीर धरून काम करावे लागते, तेव्हा मूर्तीला सुंदर रूप मिळते. आपल्यातील आध्यात्मिक सुंदरता आपल्या व्यक्तिमत्त्वातून निखरावी यासाठी ते अजूनही तेवढ्याच उत्साहाने जीव ओतून कार्य करीत आहेत. आपल्या हट्टीपणामुळे, गर्वामुळे त्यांना अपयश येत असले, तरी ते हार मानत नाही व पुन्हा नव्या जोमाने, नवे मार्ग शोधून त्यांचे कार्य सुरू ठेवतात. अशा असामान्य व्यक्तिमत्त्वाला माझा मन:पूर्वक नमस्कार. ■


## आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| Higher Communication & Other Realities | 100/- |
| 2012 - End or Beginning | 100/- |
| Preparing for 2012 | 100/- |
| Light Body & Other Realities | 75/- |
| Master-Pupil Talks | 60/- |
| iGuruji - Vol 1 | 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| iGuruji - Vol 3 | 150/- |
| iGuruji - Vol 4 | 150/- |
| iGuruji - Vol 5 | 100/- |
| iGuruji - Vol 6 | 75/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| How to Meditate | 50/- |
| Dhyana Yoga | 50/- |
| Descent of Soul | 50/- |
| Practising Shambala Principles | 50/- |
| Astral Ventures of A Modern Rishi | 50/- |
| Channelled Knowledge from the Rishis | 250/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol-2 | 150/- |
| Guruji Speaks Part - I | 200/- |
| Guruji Speaks Part - II | 200/- |
| Guruji Speaks Vol - 3 | 150/- |
| Guruji Speaks Vol - 4 | 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 | 200/- |
| The Book of Reflections - Vol 2 | 200/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences | 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| ऋषींकडून मिळालेले ज्ञान (Marathi) | 200/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| २०१२ – अंत की आरंभ? (Marathi) | 100/- |
| २०१२ सालाची तयारी (Marathi) | 100/- |
| आयगुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| उच्चस्तरीय संवाद आणि इतर सत्ये (Marathi) | 100/- |
| २०१२ सालाची तयारी (Marathi) | 100/- |
| ध्यान कैसे करें (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |

### ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)

मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१-२८६-१८९०/२४४-९५८५)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)

द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)


द वर्ड बुक शॉप, कँप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)

उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)

यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)

RNI. No. KARMAR/2008/27314 Registered Postal Regn. No. L/CNA/68/2012-14
Date of posting Newsletter-25th of Every Month. Posted at Bangalore GPO No. of Pages-8



गुरुजी कृष्णानंद (१९३९)

### मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

### मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन या ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

इथे "मानसी" नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०-जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल.

## आध्यात्मिक अनुभव

(संकलन: शोभा राव, अनुवाद: गुरुराज कानाडे)

दि. १२ जानेवारीच्या गुरुजींसोबतच्या आयगुरुजी सत्रादरम्यान, वरून खूप शक्ती माझ्यात प्रवेश करत आहेत असे मला जाणवले. काही मिनिटांनंतर मी स्वत:चे शरीर देखील पाहू शकत नव्हते. मी जेव्हा वर पाहिले तेव्हा सभोवताली फक्त प्रकाश दृष्टीस पडत होता व दूरवर गुरुजींचा तेजस्वी चेहरा दिसत होता. तसेच गुरुजींचा आवाज दूरून येतो आहे असे मला वाटले. मी थोडीशी घाबरले. मी प्रकाशास प्रार्थना केली आणि काही क्षणातच मी माझे शरीर पाहू शकले.

– राखी

जानेवारी महिन्याच्या मध्यात मी कॉस्मिक टॉवरशी मानसिक संपर्क साधून ध्यानास सुरुवात केली. मी एक आवाज ऐकला, तुला इनिशियेट करण्यात आले आहे. नंतर गुरुजींनी मला सांगितले की, स्वतः कॉस्मिक टॉवर माझ्याशी बोलला आणि तेव्हा मला काही प्रमाणात ऊर्जा देण्यात आली.

– नंदिता विजयन

गेल्या आठवड्यात मी उत्तर कर्नाटकातील एका तीर्थक्षेत्रास भेट दिली जे एका संतासाठी प्रसिद्ध आहे. तेथे रात्री ८.३० वाजल्या नंतर मंदिरात प्रवेश वर्ज्य आहे. तेथे असताना एके रात्री एका माणसाच्या गाण्याचा धीरगंभीर व मंजुळ आवाज आमच्या कानी पडला. तो आवाज मंदिरातून येत होता. एका जेष्ठ व्यक्तींनी आम्हाला खात्री दिली की रात्री देवता तेथे आराधना करण्यासाठी येतात. आम्हाला कृतकृत्य झाल्यासारखे वाटले.

– सौम्या अजय

मी एक पुस्तक वाचत होतो. त्यात लेखकाने विश्वातील प्रत्येक गोष्टीचा गाभा प्रकाश आहे व प्रकाशाचा गाभा प्रेम आहे असे नमूद केले होते. अचानकपणे काय झाले मला माहीत नाही पण मी खूप आनंदी झालो. माझ्या भोवताली सर्वकाही तेजाने चकाकत आहे अशी कल्पना करीत मी बराच वेळ स्वत:शीच स्मित करीत होतो व मला स्वत:शी कोणतीही तक्रार नव्हती. बहुधा एका दशकानंतर मी अगदी मनापासून स्मित केले असावे. आता मला थोडेसे उमगले आहे की पूर्णपणे प्रेममय असणे म्हणजे नक्की काय असते. हा गुरुजींचा व ऋषींचा आशीर्वाद होता.

– राकेश मिश्रा

अलीकडे मी खरोखरच प्रकाशाचा प्रत्यक्ष अनुभव घेत आहे. अगदी सहजपणे माझे ध्यान लागते आणि ऊर्जेची प्रचंड लाट आल्यामुळे माझ्या सभोवताली प्रकाशाचा जणूकाही विस्फोट होतो. प्रकाश माझ्या दृष्टीस पडत नाही पण त्याचे माझ्या भोवतालचे अस्तित्व मात्र जाणवते. प्रामुख्याने मला पांढरा प्रकाश जाणवतो. एकदा ध्यान करताना चंदेरी ठिणग्यांप्रमाणे मला प्रकाशाचा विस्फोट होताना दिसला व त्यानंतर मी लागलीच पूर्ण स्तब्धतेत माझ्या हृदयात स्थिरावले. काहीवेळा मला माझ्या शरीराचे भानच राहत नाही व वाटते की मी प्रकाश गोल आहे.

– गीतांजली बालकृष्णन

माझ्या भावाच्या लग्नाच्या वाढदिवशी उभयतांना शुभेच्छा देण्याकरिता मी 'ईमेल' पाठविण्याचा प्रयत्न केला पण मी तो पाठवू शकले नाही. त्यानंतर दिवसभर मी घरकामात व्यस्त होते. मला या गोष्टीचा पूर्ण विसर पडला. पण त्या रात्री मला वाटले की मी सूक्ष्म देहाने त्यांच्याकडे जाऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. तेव्हा त्यांनी मला ओळखले व मला प्रतिसाद दिला. मी आश्चर्यचकित झाले व माझ्या भावाला विचारले देखील, "तुला माझी उपस्थिती जाणवते आहे का?" तो म्हणाला "हो". मी माझ्या शरीरात कशी काय परतले हे मला माहीत नाही पण हे सर्व अगदी रोमांचित करणारे व आश्चर्यकारक होते!

– किरणमयी

काही दिवसांपूर्वी मी सोनेरी प्रकाशरूपी प्राणशक्ती ग्रहण करण्याच्या तंत्राचा अभ्यास करीत होते. अचानक मला आपल्या एका ध्यान साधकाचा फोन आला. पलीकडून त्या अतींद्रिय क्षमता असलेल्या व्यक्तीने मला सांगितले की त्यावेळी तिला एक सोनेरी-नारिंगी रंगाचा तेजस्वी प्रकाश गोल दिसत होता. त्यातून बाहेर पडणाऱ्या सोनेरी प्रकाश किरणांचा माझ्यावर वर्षाव होत होता. तिने मला सोनेरी प्रकाशाच्या रूपात पाहिले.

– नागमणी चंद्रशेखर

२ मार्चला रात्री मला स्वप्नात दिसले की, संपूर्ण मानसा परिवार आणि पुष्कळ इतर लोक एका मोठ्या हॉलमध्ये गोळा झाले आहेत. स्टेजच्या मध्यभागी गुरुजी बसले होते आणि काही लोकांसोबत काही चर्चा करीत होते. आपले स्वयंसेवक कार्यक्रमाच्या व्यवस्थेत लागलेले होते. त्यापूर्वी मला असे वाटले की, आम्ही एका चर्चमध्ये बसलो होतो आणि जीझस खाइस्ट यांना प्रार्थना करीत होतो. झोपेतून उठल्यानंतर मला खूप शांती व प्रेमाचा अनुभव झाला. नंतर गुरुजींनी सांगितले की, ७ मे या दिवशी होणाऱ्या लाइट चॅनल्स मीटचे दृश्य मला दिसले !

– कमल डी.

PRAKASHMARG A Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 300/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077 and
Printed at M/s. ART PRINT, Dr. Modi Hospital Main, WOC Road, Bangalore - 86. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077.
Editor : Jayant Deshpande